**डुक्करवाडी, ता.चंदगड येथे अनाधिकृत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणी केलेबाबत दिनांक 05/10/2021 इ रोजी पुतळा समितीची बैठक घेणेत आली. त्याचा इतिवृत्तांत खालीलप्रमाणे.**

---

मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली डुक्करवाडी, ता.चंदगड येथे अनाधिकृत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणी केलेबाबत दि.05/10/2021 रोजी सायं.4.00 वाजता श्री शाहूजी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे पुतळा समितीची बैठक घेणेत आली. सदर बैठकीस समितीतील खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.नं. | समितीतील शासकीय अधिकारी | समितीमधील हुद्दा |
|---|---|---|
| 1. | मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर | अध्यक्ष |
| 2. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर | सदस्य |
| 3. | जिल्हा पोलिस अधीक्षक, कोल्हापूर | सदस्य |
| 4. | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) कोल्हापूर | सदस्य |
| 5. | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, कोल्हापूर | सदस्य |

प्रथम मा.जिल्हाधिकारीसो, कोल्हापूर तथा अध्यक्ष यांनी उपस्थित सर्व समितीमधील सदस्य यांचे स्वागत करून आजची बैठक ही डुक्करवाडी, ता.चंदगड येथे अनाधिकृत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारणी केलेचे अनुषंगाने आयोजित केलेली आहे असे सांगितले.

प्रथमतः चंदगड पोलिस ठाणे यांचेकडून दि.25/05/2021 रोजीचे प्राप्त अहवालावर चर्चा झाली. अहवालामध्ये डुक्करवाडी, ता.चंदगड या गावामध्ये मराठा समाज 40%, बेरड समाज 40% व दलित समाज 20% आहे. तसेच डुक्करवाडी गावचे बसस्टॉप चौकात गट क्र.165 या जागेत दि.14/04/2021 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी दलित समाजाने निळा ध्वज ग्रामपंचायतीची परवानगी न घेता उभा केलेला होता. सदरचा ध्वज कोणीतरी अज्ञात इसमाने रात्रीचा काढून पळवला होता. याबाबत ग्रामपंचायत कार्यालयात बैठक घेऊन ध्वज सन्मानपूर्वक परत देणेबाबत सांगण्यात आले. त्यानंतर सदरचा सन्मानपूर्वक ध्वज परत दिलेनंतर पहिल्या ठिकाणी उभारण्यात आला होता. सदर गावामध्ये दिनांक 30/04/2021 रोजी रात्री डुकरवाडी, ता.चंदगड गावचे सुरूवातीस डुक्करवाडी गट क्र.165 मधील शासकीय जमीन व लक्ष्मी दुधसंस्थेच्या जागेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभा करणेत आला आहे. त्यामुळे गावामध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. सदरचा पुतळा कोणी बसवला हे माहित नसून ग्रामपंचायतीमार्फत कोणत्याही प्रकारची परवानगी दिलेली नसलेचे ग्रामपंचायतीने सांगितले. त्यामुळे सदर पुतळा शासनाची रितसर परवानगी घेवून उभा करावा व उभारणी केलेला पुतळा आपण स्वतःहून सन्मानाने काढून घ्यावा अन्यथा सदर पुतळा उभारणी कारणावरून कोणताही अनुचित प्रकार अथवा कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करणेत येईल अशी नोटीस देण्यात आली आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज यांचे अध्यक्षतेखाली तहसिल कार्यालय गडहिंग्लज येथे बैठक घेऊन सदर पुतळा परवानगी न घेता उभारणी केल्याने सन्मानाने काढुन घेऊन संरक्षित ठिकाणी ठेवणेचे सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच त्याच ठिकाणी उभा करणेत आलेला निळा ध्वज परवानगी न घेता उभारणी केल्याने सन्मानाने काढून घेऊन संरक्षित ठिकाणी ठेवणेचे सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार ग्रामपंचायत जागेवर उभा करणेत आलेला ध्वज काढून घेण्यात आला परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा

Scanned with CamScanner

अदयापपर्यंत काढण्यात आलेला नाही. यामुळे डुक्करवाडी गावामधील दलित समाज व सवर्ण समाजामध्ये जातीय तेढ निर्माण होवून कोणत्याही क्षणी अनुचित घटना घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याचे व सदरचा छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा काढून घेणेबाबत आदेश मिळणेबाबत पोलिस निरिक्षक चंदगड यांनी इकडील कार्यालयास कळविले होते.

उपविभागीय अधिकारी गडहिंग्लज यांनी मौ.डुक्करवाडी, ता.चंदगड येथील गट नं.165 ही शासकीय मिळकत असून सदर मिळकतीन बेकायदेशीररित्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे. सदर पुतळा उभारण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन निर्णय दि. 2 मे 2017 मध्ये दिले मार्गदर्शक सुचनेनुसार रितसर परवानगी न घेता उभारलेचे दिसून येत आहे. तरी महाराष्ट्र शासन निर्णय दि. 2 मे 2017 मध्ये नमूद अ.क्र.14 नुसार ग्रामपंचायत डुक्करवाडी यांचेवर कारवाई करणेबाबत अहवाल सादर केला आहे.

सदर सभेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सदर पुतळा दुधसंस्थेच्या जागेत आहे असे सांगितले. मात्र याबाबत अहवाल सादर केला नाही. तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (दक्षिण) कोल्हापूर व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी प्रस्तूत पुतळयाबाबत कोणतीही परवानगी दिलेली नसल्याचे म्हटले.

मा.जिल्हाधिकारीसो यांनी उपविभागीय अधिकारी गडहिंग्लज व चंदगड पोलिस ठाणे यांचेकडील प्राप्त अहवालानुसार डुक्करवाडी गट नं.165 मधील शासकीय जमीन व लक्ष्मी दुधसंस्थेच्या जागेत उभारणेत आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृत उभारणी केलेने तसेच जातीय तेढ निर्माण होण्याची शक्यता असलेने सदर पुतळा काढून घेणेबाबत जिल्हा पोलिस अधीक्षक, कोल्हापूर यांना निर्देश देवून बैठक संपलेचे जाहिर केले. सदरील बाबीत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी संपूर्ण सहकार्य करावे व त्वरित पूर्तता करावी.

सही/-
जिल्हादंडाधिकारी कोल्हापूर

क्र. कार्या-7गृह/1/आरआर/ 1983 /2021
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दिनांक - 17/11/2021
23

प्रत,

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर
2. जिल्हा पोलिस अधिक्षक, कोल्हापूर
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग कोल्हापूर
4. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, कोल्हापूर

अपर जिल्हादंडाधिकारी कोल्हापूर

Scanned with CamScanner